मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# गणेशोत्सवात पुणे मेट्रोची 'धाव'! गतवर्षीपेक्षा 21.40 टक्के झेप

## वाहतूक कोंडीला पुणेकरांचा मेट्रोचा पर्याय; मंडई, जिल्हा न्यायालय स्थानकांवर विक्रमी गर्दी

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात पुणेकरांनी वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून पुणे मेट्रोला मोठी पसंती दिली आहे. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी (१४ सप्टेंबर) तब्बल २ लाख ६२ हजार ६७१ प्रवाशांनी पुणे मेट्रोने प्रवास केला. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या प्रवासी संख्येत ४६ हजार २९७ प्रवाशांची वाढ झाली असून, एकूण प्रवासी संख्येत २१.४० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे.**



गणेशोत्सव काळात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे मेट्रो प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ व आरामदायी व्हावा यासाठी मेट्रो गाड्यांची वारंवारता वाढवून दर पाच मिनिटांनी सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे शहरातील प्रमुख गणेश मंडळांकडे जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. रात्री ११ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकावर सर्वाधिक ५१ हजार ५३३ प्रवाशांची नोंद झाली. तर इंटरचेंज केंद्र असलेल्या जिल्हा न्यायालय (डिस्ट्रिक्ट कोर्ट) स्थानकावर ५८ हजार ९४८ प्रवाशांनी प्रवास केला. या दोन्ही स्थानकांवर गतवर्षीच्या तुलनेत सुमारे २२ टक्क्यांपर्यंत वाढ दिसून आली. याशिवाय पीसीएमसी स्थानकावर २५ हजार ४२९, रामवाडी स्थानकावर २३ हजार ६४४, स्वारगेट स्थानकावर २१ हजार ९९ आणि पीएमसी स्थानकावर १९ हजार २६७ प्रवाशांची नोंद झाली.

गणेशोत्सवाच्या कालावधीत भाविकांना रात्री उशिरापर्यंत गणपती दर्शन घेता यावे यासाठी पुणे मेट्रोने विशेष विस्तारित वेळापत्रक लागू केले आहे. तसेच कसबा पेठ, स्वारगेट, पीएमसी, डेक्कन जिमखाना आणि छत्रपती संभाजी महाराज उद्यान या स्थानकांचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. गर्दीचे प्रभावी नियोजन करण्यासाठी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकाचा वापर प्रामुख्याने परतीच्या प्रवासासाठी करावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच तिकीट खिडक्यांवरील गर्दी कमी करण्यासाठी क्यूआर कोड, मेट्रो ॲप आणि व्हॉट्सॲपद्वारे उपलब्ध डिजिटल तिकीट सुविधेचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शहरातील वाहतूक कोंडी टाळून सुरक्षित, जलद आणि आरामदायी प्रवासासाठी अधिकाधिक नागरिकांनी पुणे मेट्रो सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे मेट्रो प्रशासनाने केले आहे.

# मलेशियात 'आरकेएल गॅलेक्सी'च्या विद्यार्थ्यांची सुवर्णमय कामगिरी!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मलेशिया येथे पार पडलेल्या मानाच्या आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धा २०२६ मध्ये पुण्यातील ' आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल' (RKL GALAXY INTERNATIONAL SCHOOL) च्या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर भारताचा तिरंगा दिमाखात फडकवला आहे. शाळेचे होतकरू खेळाडू वेदार्थ तापकीर आणि विश्वजीत पवार यांनी उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर पदकांची लयलूट करत पुणे आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.**




> "आमच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशामुळे भारतीय पारंपरिक युद्धकला 'सिलंबम'चा गौरव जागतिक पातळीवर अधिक उंचावला आहे. शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही यातून नवी प्रेरणा मिळेल."
>
> – डॉ . पुष्कर चौबे, (चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर – CEO)

> "वेदार्थ आणि विश्वजीत यांनी दाखवलेली शिस्त आणि घेतलेले कठोर परिश्रम खरोखरच कौतुकास्पद आहेत. दोन्ही विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचे मनापासून अभिनंदन!"
>
> – मिस मित्तल शहा, (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर- CEO)

मलेशियात झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विविध देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा जागतिक स्तरावरील स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपल्या पारंपरिक युद्धकलेचे कौशल्य दाखवत उल्लेखनीय यश मिळवले. वेदार्थ तापकीर याने पोरुथल अर्थात काठीची लढत या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक, तर ओपन वेपन प्रकारात कांस्य पदक पटकावले.

दुसरीकडे, विश्वजीत पवार यानेही आपल्या आक्रमक खेळाचे आणि अचूक तंत्राचे दर्शन घडवत पोरुथल प्रकारात रौप्य पदक मिळवले. तसेच काठी फिरवणे या प्रकारात त्याने कांस्य पदकावर नाव कोरले. दोन्ही खेळाडूंनी आत्मविश्वास, शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय मंचावर आपली वेगळी छाप पाडली.

या भारतीय संघासोबत सिलंबम स्पोर्ट्स फेडरेशनचे अध्यक्ष आणि महाराष्ट्रातील एकमेव आंतरराष्ट्रीय सिलंबम एक्सपर्ट संजय बनसोडे तसेच आंतरराष्ट्रीय रेफरी स्मिता धीवर यांनी अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थिती नोंदवली. त्यांनी स्पर्धेदरम्यान भारतीय खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा आणि खेळाडूंच्या सातत्यपूर्ण सरावाचा या यशात महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगण्यात आले.

वेदार्थ तापकीर आणि विश्वजीत पवार यांच्या या आंतरराष्ट्रीय यशामुळे आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. विशेष म्हणजे, भारतीय पारंपरिक युद्धकला असलेल्या सिलंबमला जागतिक व्यासपीठावर मिळणारी ओळख आणि या माध्यमातून भारतीय खेळाडूंची वाढती कामगिरी यामुळे क्रीडाप्रेमींमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींकडून वेदार्थ आणि विश्वजीत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली आहे.

# पिंपरी-चिंचवडकरांना पुण्याच्या हेलपाट्यांतून मुक्त करा!

## सहकार प्रश्नांसाठी पुण्याची वारी! बोराटेंची स्वतंत्र न्यायालयाची मागणी!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरातील सहकारी गृहनिर्माण संस्था व सभासदांच्या प्रकरणांचा तात्काळ आणि स्थानिक पातळीवर निपटारा व्हावा, यासाठी शहरात स्वतंत्र सहकार न्यायालय स्थापन करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सभापती तथा नगरसेविका सुजाता निलेश बोराटे यांनी यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले असून, याबाबतचा प्रस्ताव तातडीने तयार करून राज्य शासनाच्या संबंधित विभागाकडे मंजुरीसाठी पाठवावा, असा आग्रह धरला आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून लोकसंख्येबरोबरच सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरामध्ये सध्या सुमारे नऊ हजारांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये सभासदांचे हक्क, संस्थांचे व्यवस्थापन, पदाधिकाऱ्यांमधील मतभेद, निवडणूक प्रक्रिया, आर्थिक व्यवहार तसेच सहकार कायद्याशी संबंधित विविध स्वरूपाचे वाद वारंवार निर्माण होत असतात. सध्या पिंपरी-चिंचवडमधील सहकारी संस्थांशी संबंधित प्रकरणांसाठी नागरिकांना पुणे येथील सहकार न्यायालयात जावे लागते. त्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च होत आहेत; विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि सर्वसामान्य सभासदांना वारंवार पुण्यात हेलपाटे मारताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे बोराटे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

शहराची वाढती लोकसंख्या, सहकारी संस्थांची मोठी संख्या आणि त्यांच्याशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांचा वाढता व्याप लक्षात घेता पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र सहकार न्यायालय सुरू करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हे न्यायालय शहरात सुरू झाल्यास नागरिकांना त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी स्थानिक पातळीवर जलद, सुलभ आणि कमी खर्चात न्याय मिळण्यास मदत होणार आहे. महानगरपालिकेने विधी समितीच्या माध्यमातून या विषयाचा राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करावा, तसेच न्यायालयासाठी आवश्यक जागा, कार्यालयीन सुविधा, मनुष्यबळ आणि इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शहरातील हजारो सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि लाखो सभासदांना न्यायालयीन कामकाजासाठी पुण्यात जावे लागते. पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्र न्यायालय सुरू झाल्यास नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचून त्यांना स्थानिक पातळीवर जलद न्याय मिळेल. त्यामुळे महापालिकेने तातडीने प्रस्ताव तयार करून तो राज्य शासनाकडे सादर करावा, अशी भूमिका मांडतानाच, या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने स्वतंत्र सहकार न्यायालयाचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावा आणि त्यावर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती विधी समितीला द्यावी, अशी विनंतीही सुजाता बोराटे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# रामायण मैदानावरील अनधिकृत पार्किंग हटवा आणि मंजूर निधीची चौकशी करा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मोशी-प्रभाग क्रमांक दोनमधील रामायण मैदानावर मोठ्या प्रमाणावर उभ्या राहणाऱ्या जड वाहनांमुळे मुलांच्या खेळण्याचा हक्क हिरावला जात असून, या मैदानाच्या विकासासाठी मंजूर झालेल्या तब्बल २२ कोटी रुपयांच्या निधीची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते तसेच सामाजिक कार्यकर्ते विशाल आहेर यांनी केली आहे. मैदानावरील वाढत्या अतिक्रमणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधताना त्यांनी येथील परिस्थितीवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.**





रामायण मैदानाचा परिसर सध्या खेळाचे मैदान न राहता अनधिकृत ट्रान्सपोर्ट पार्किंगचा अड्डा बनला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मैदानावर सर्वत्र मोठी वाहने उभी राहत असल्याने मुलांना खेळण्यासाठी मोकळी जागाच शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे सार्वजनिक वापरासाठी असलेल्या मैदानाचा नेमका वापर कशासाठी होत आहे, असा सवाल उपस्थित झाला आहे. दोन दिवसांपूर्वी मैदानावर खेळणाऱ्या लहान मुलांचा चेंडू एका वाहनाला लागल्याने वाहनचालकांनी मुलांना मारहाण केली, तसेच त्यांचा चेंडूही ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांनी जबरदस्तीने घेऊन गेल्याचा गंभीर आरोप विशाल आहेर यांनी केला आहे.

या प्रकारामुळे मैदानावर खेळण्यासाठी येणाऱ्या मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, पालकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक मैदानावर मोठ्या प्रमाणात ट्रान्सपोर्टची वाहने उभी केली जात असताना ही वाहने नेमकी कोणाची आहेत, मैदानात वाहने उभी करण्यास परवानगी कोणी दिली, या वाहनांमधून कोणाचे खिसे भरले जात आहेत आणि या गाड्यांचे भाडे कोण वसूल करते, याची महापालिका प्रशासनाने तातडीने चौकशी करावी, अशी मागणी आहेर यांनी केली आहे.

दरम्यान, रामायण मैदानाच्या विकासासाठी महापालिकेने तब्बल २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र, एवढा मोठा निधी मंजूर होऊनही मैदानाचा अपेक्षित विकास का झाला नाही, असा सवाल विशाल आहेर यांनी उपस्थित केला आहे. मंजूर निधी नेमका कुठे आणि कोणत्या कामांसाठी खर्च करण्यात आला, प्रत्यक्षात किती कामे झाली आणि त्यावर किती निधी खर्च झाला, याची सविस्तर माहिती घेऊन संपूर्ण निधीच्या विनियोगाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मैदानावरील वाहनांची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पाण्याच्या टाकीच्या बाजूला असलेल्या सुमारे एक एकर जागेत स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोप आहेर यांनी केला. स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था झाल्यास मैदानावरील मोठ्या वाहनांचा प्रश्न दूर होऊन मुलांना खेळण्यासाठी मैदान मोकळे करता येईल, असे त्यांनी सांगितले.

# दीडशे कोटींच्या सायबर घोटाळ्याचा पर्दाफाश!

## ६५ नागरिकांची फसवणूक; ३ खात्यांत १.१५ कोटी जमा, 'म्युल अकाउंट'चा वापर

**पिंपरी | प्रतिनिधी**

**देशातील विविध राज्यांतील ६५ नागरिकांना इन्व्हेस्टमेंट फ्रॉडसह विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीत अडकवून तब्बल १५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणातील टोळीशी संबंधित असल्याच्या आरोपावरून सचिन संजय काळे (वय २५, रा. गोडाऊन चौकाजवळ, मोशी, ता. हवेली, जि. पुणे) याला आळंदी पोलिसांनी अटक केली आहे.**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आळंदी पोलीस ठाण्यात स्थापन करण्यात आलेल्या सायबर सेलमार्फत 'म्युल अकाउंट' संदर्भात तपास सुरू होता. या तपासादरम्यान सचिन काळे याचे कॉसमॉस बँक, आळंदी येथील बचत खाते ऑनलाइन फसवणुकीतून मिळालेली रक्कम स्वीकारण्यासाठी वापरले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७४/२०२६ आणि २८३/२०२६ अन्वये बीएनएसच्या विविध कलमांखाली दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांच्या तपासानुसार, आरोपीने स्वतःच्या नावावर विविध बँकांमध्ये एकूण ९ बँक खाती उघडली होती. सायबर फसवणुकीतून आलेली रक्कम या खात्यांवर स्वीकारून ती एटीएम तसेच चेकच्या माध्यमातून काढण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.

विशेष म्हणजे, NCRP पोर्टलवरील उपलब्ध माहितीनुसार देशातील विविध राज्यांतील एकूण ६५ नागरिकांची सुमारे १५० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

त्यापैकी सचिन काळे याच्या विविध तीन बँक खात्यांमध्ये सुमारे १ कोटी १५ लाख रुपये जमा झाल्याचे तपासात आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी काळे याला अटक केली असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध आणि पुढील आर्थिक व्यवहारांचा तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त शशीकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आव्हाड, अपर पोलीस आयुक्त प्रादेशिक विभाग बसवराज तेली, पोलीस उपायुक्त मारुती जगताप आणि सहाय्यक पोलीस आयुक्त योगेश रांजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. नरके, उपनिरीक्षक तुकाराम खडके, महिला पोलीस हवालदार आरती निकम, पोलीस शिपाई सोळंके आणि जगताप यांच्या पथकाने केली.

पोलिसांचे नागरिकांना आवाहन आपल्या नावावरील बँक खाते किंवा सिमकार्ड कोणत्याही अनोळखी व्यक्तीला वापरण्यास देऊ नये. तसेच अनोळखी व्यक्तीकडून ऑनलाइन पैसे स्वीकारून ते एटीएम किंवा चेकद्वारे रोख स्वरूपात काढून देऊ नयेत. अशी रक्कम ऑनलाइन फसवणुकीतून आलेली असण्याची शक्यता असून संबंधित बँक खाते 'म्युल अकाउंट' म्हणून वापरले जाऊ शकते, असा इशारा पोलिसांनी दिला.

# ६० कोटींच्या 'बोगस उपसूचना' घोटाळ्यावर पडदा टाकण्याची तयारी?

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन २०२५-२६च्या अर्थसंकल्पातील तब्बल ६० कोटी १८ लाख ६८ हजार ५३ रुपयांच्या कथित 'बोगस उपसूचना' प्रकरणाला आता कायदेशीर कारवाई करण्याऐवजी प्रशासकीय प्रक्रियेतूनच 'क्लोज' करण्याचा घाट घातला जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या प्रकरणाची तक्रार खुद्द स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली होती. त्यानंतर पाच सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली. समितीने १२ जून रोजी अहवाल सादर केला असून, त्यामध्ये १३ उपसूचना बोगस असल्याचे निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. या उपसूचनांच्या आधारे स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता तब्बल ६०.१८ कोटी रुपयांची बिले ठेकेदारांना अदा करण्यात आल्याचे चौकशीत समोर आले.**



महापालिका सभेने २४ मार्च २०२६ रोजी सन २०२५-२६च्या अर्थसंकल्पाला मंजुरी दिल्यानंतर ३० मार्च रोजी नगरसेवकांच्या नावाने देण्यात आलेल्या विविध उपसूचनांपैकी १३ उपसूचना बोगस असल्याचे चौकशी समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले. मुख्य लेखा व वित्त विभागाकडून या उपसूचनांच्या आधारे परस्पर निधी वर्ग करून संबंधित ठेकेदारांची बिले अदा करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकाराची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणी झाल्यानंतर तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना आयुक्तांनी १० एप्रिल रोजी सक्तीच्या रजेवर पाठविले होते. त्यानंतर अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली.

चौकशी समितीचा अहवाल आयुक्तांकडे सादर झाल्यानंतर पुढील कारवाईसाठी तो राज्य शासनाच्या वित्त विभागाकडे पाठविण्यात आला. मात्र, या प्रकरणात अद्याप कोणावरही ठोस कारवाई झालेली नाही. पोलिसांतही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. दरम्यान, प्रवीण जैन यांची नवी मुंबई महापालिकेत बदली झाली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या आर्थिक अनियमिततेचा चौकशी अहवाल शासनाकडे पाठवूनही कारवाईची प्रतीक्षा कायम असताना आता प्रशासनाने याच ६० कोटी १८ लाख ६८ हजार ५३ रुपयांच्या रकमेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत वाढ-घट करण्यास मान्यता देऊन हा प्रस्ताव महापालिका सभेकडे शिफारस करण्यासाठी स्थायी समितीसमोर ठेवला आहे.

विशेष म्हणजे, ज्या रकमेच्या वर्गीकरणाचा आधारच कथित बोगस उपसूचना असल्याचा चौकशी अहवालात निष्कर्ष आहे, त्याच रकमेचे अर्थसंकल्पीय वर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने या प्रकरणावर कायदेशीर कारवाई होण्याआधीच प्रशासकीय पातळीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न होत आहे का, असा सवाल उपस्थित झाला आहे. घोटाळ्याची चौकशी पूर्ण झाली, अहवाल शासनाकडे गेला; मात्र गुन्हा दाखल नाही, संबंधितांवर अंतिम कारवाई नाही आणि आता त्याच रकमेच्या वर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेबाबत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

या प्रकरणामुळे महापालिकेतील सत्ताधारी भाजपमध्येही मतभेद उघड झाले होते. पक्षातील एका गटाने संबंधितांवर कारवाईची भूमिका घेतली होती, तर दुसऱ्या गटाकडून प्रकरण शांत करण्याच्या हालचाली होत असल्याची चर्चा होती. विरोधकांनीही पोलिसांत गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, अद्याप पोलिसांत तक्रार दाखल झालेली नाही. आता चौकशी अहवालावर अंतिम कारवाई होण्याआधीच ६०.१८ कोटींच्या रकमेचे अर्थसंकल्पीय वर्गीकरण करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने, महापालिकेतील एवढ्या मोठ्या आर्थिक अनियमिततेचा शेवट कारवाईने होणार की केवळ कागदोपत्री वर्गीकरण करून प्रकरण मिटवले जाणार? असा थेट प्रश्न उपस्थित झाला आहे.

# गणेशोत्सवाआधी पुणे मंडईतील अतिक्रमणांवर महापालिकेचा बुलडोझर!

## शनिपार ते रामेश्वर चौक रस्ता केला मोकळा; कारवाईला नागरिकांचा विरोध!




**पुणे | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या तोंडावर महात्मा फुले मंडई परिसरातील अतिक्रमणांवर अखेर महापालिकेने धडक कारवाई केली. रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास महापालिकेच्या पथकाने जेसीबीच्या साह्याने अनधिकृत पत्राशेड, दुकाने, स्टॉल, हातगाड्या आणि कठडे जमीनदोस्त केले. या कारवाईला काही नागरिकांनी विरोध केल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, पोलिस बंदोबस्तात महापालिकेने कारवाई पूर्ण करून रस्त्यावरील अडथळे हटविले.**

रस्त्यावरील अतिक्रमणांमुळे मंडई परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम होत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेली दुकाने, स्टॉल, हातगाड्या आणि पत्र्याच्या शेडमुळे रस्त्याची प्रत्यक्ष रुंदी कमी झाली होती. त्यामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता, तर पादचाऱ्यांनाही रस्त्यावरूनच मार्ग काढावा लागत होता. गणेशोत्सवाच्या काळात या परिसरात भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता होती. त्यामुळे अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात होती.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही अतिक्रमणे कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. गर्दीच्या काळात एखादी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने किंवा पोलिसांच्या वाहनांना मार्ग काढणेही अवघड होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी पोलिस आयुक्त, महापालिका आयुक्त, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी मंडई परिसराची पाहणी केली होती. पाहणीदरम्यान रस्त्यावरील अतिक्रमणांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला

गणेशोत्सव काळातील संभाव्य गर्दी लक्षात घेऊन रस्ते मोकळे ठेवण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला करण्यात आल्या होत्या.

यानंतर महापालिका प्रशासनाने अतिक्रमण हटाव कारवाईची तयारी केली. रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास मंडई परिसरातील अनेक दुकाने बंद झाल्यानंतर महापालिकेच्या पथकाने कारवाईला सुरुवात केली. जेसीबीसह आवश्यक यंत्रसामग्री घटनास्थळी दाखल करण्यात आली होती. त्यानंतर रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेली अनधिकृत पत्र्याची दुकाने, स्टॉल, हातगाड्या, कठडे तसेच इतर अडथळे हटविण्यास सुरुवात करण्यात आली. जेसीबीच्या साह्याने काही पत्राशेड आणि बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

अचानक सुरू झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये खळबळ उडाली. सणासुदीच्या काळात व्यवसायाचा मोठा हंगाम असताना अतिक्रमण हटविण्याची कारवाई केल्याने आर्थिक नुकसान होत असल्याचा आक्षेप काही व्यावसायिकांनी घेतला. त्यामुळे काही काळ महापालिका अधिकारी आणि नागरिकांमध्ये शाब्दिक वादही झाला. कारवाई थांबविण्याची मागणी करण्यात आली. मात्र, महापालिका प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याची भूमिका कायम ठेवली.

परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांच्या उपस्थितीत महापालिकेच्या पथकाने कारवाई पुढे सुरू ठेवली. रस्त्यावर अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत संरचना आणि हातगाड्या हटविल्यानंतर हळूहळू रस्त्यावरील जागा मोकळी होऊ लागली. त्यामुळे वाहतुकीसाठी तसेच पादचाऱ्यांसाठी अधिक जागा उपलब्ध झाली.

गणेशोत्सवात मंडई परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने रस्ते मोकळे ठेवणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी वाहतूक कोंडी टाळणे, पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालता यावे आणि गर्दीच्या वेळी आपत्कालीन यंत्रणांना सहज मार्ग उपलब्ध व्हावा, या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, केवळ गणेशोत्सवापुरती कारवाई न करता पुढील काळातही मंडई परिसरात पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत, यासाठी नियमित पाहणी आणि कारवाई करण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## ग्रामीण विकासाला आता 'सहयोग'चा हात; पुणे परिषदेचे सीएसआरसाठी स्वतंत्र पोर्टल!

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विकासकामांना आता कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (सीएसआर) अधिक प्रभावीपणे लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाड्या, आरोग्य केंद्रे, पाणीपुरवठा व्यवस्था, पर्यावरण संवर्धन, क्रीडा सुविधा आणि कौशल्य विकासाशी संबंधित प्रकल्पांना सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने 'सहयोग' हे स्वतंत्र सीएसआर पोर्टल विकसित केले आहे. या डिजिटल व्यासपीठामुळे कंपन्यांना त्यांच्या सीएसआर धोरणाशी सुसंगत असलेले गरजू आणि प्राधान्यक्रमातील प्रकल्प एकाच ठिकाणी पाहता येणार आहेत.**




ग्रामीण भागातील विविध विकासकामांसाठी सीएसआर निधी मिळविताना जिल्हा परिषद प्रशासन, संबंधित कंपन्या आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी अनेकदा स्वतंत्र पातळीवर पाठपुरावा करावा लागतो. एखाद्या गावात सुविधा आवश्यक असतानाही त्याची माहिती संबंधित कंपनीपर्यंत वेळेत पोहोचत नसल्याने निधी आणि गरज यांच्यामध्ये दरी निर्माण होत होती. ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने 'सहयोग' पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.

या पोर्टलवर ग्रामीण भागातील कोणत्या गावात किंवा ठिकाणी कोणत्या सुविधेची आवश्यकता आहे, कोणते प्रकल्प प्राधान्याचे आहेत, त्या प्रकल्पासाठी किती निधीची गरज आहे तसेच कोणत्या प्रकारचे सहकार्य अपेक्षित आहे, याची माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे कंपन्यांना आपल्या सीएसआर धोरणानुसार योग्य प्रकल्प निवडणे सोपे होणार आहे. विशेष म्हणजे, निधीची आवश्यकता असलेले प्रकल्प आणि निधी देण्यास इच्छुक कंपन्या यांना एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे.

प्रकल्पांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनाही या पोर्टलवर अंमलबजावणी भागीदार म्हणून नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे सीएसआर निधी उपलब्ध करून देणारी कंपनी, प्रकल्प राबविणारी स्वयंसेवी संस्था आणि जिल्हा परिषद प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक सुलभ आणि गतिमान होण्याची अपेक्षा आहे. प्रकल्पाच्या गरजेपासून ते त्याच्या अंमलबजावणीपर्यंतची प्रक्रिया अधिक व्यवस्थित करण्यास या डिजिटल यंत्रणेची मदत होऊ शकते.

'सहयोग' पोर्टलच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, पाणीपुरवठा, पर्यावरण, पायाभूत सुविधा, क्रीडा आणि कौशल्य विकास अशा विविध क्षेत्रांतील प्रकल्पांना सीएसआर निधी मिळविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील प्रत्यक्ष गरज ओळखून त्यानुसार सीएसआर निधी वळविण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे निधी केवळ उपलब्ध होण्यापेक्षा तो योग्य ठिकाणी आणि आवश्यक प्रकल्पासाठी वापरला जाण्याची शक्यता वाढणार आहे.

ग्रामीण भागात अनेक विकासकामांना निधीची आवश्यकता असते; मात्र त्या गरजा उद्योग आणि कंपन्यांपर्यंत पोहोचवण्याची प्रभावी यंत्रणा अनेकदा उपलब्ध नसते. दुसरीकडे, कंपन्यांनाही आपल्या सीएसआर निधीसाठी योग्य आणि परिणामकारक प्रकल्प शोधावे लागतात. 'सहयोग' पोर्टलमुळे या दोन्ही बाजूंना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न होणार आहे. परिणामी गरजू प्रकल्पांना निधी मिळण्याची प्रक्रिया सुलभ होऊन ग्रामीण विकासामध्ये उद्योगांचा सहभाग अधिक प्रभावीपणे वाढण्यास मदत होणार आहे.